(महाराष्ट्र शासन)

# सार्वजनिक आरोग्य विभाग, आरोग्य सेवा आयुक्तालय

**मनोरुग्ण तज्ञ परिचारीका प्रशिक्षण** (डी.पी.एन.)

प्रशिक्षण कालावधी १२ महिने

# प्रवेश नियम पुस्तिका

# सन २०२५-२०२६

आरोग्य भवन, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी.डिमेलो रोड,मुंबई- ४०० ००१

संकेतस्थळ - http://arogya.maharashtra.gov.in

ईमेल - ddhsnursingmumbai@gmail.com

ddhsnursing.dhs-mh@mah.gov.in

दुरध्वनी - ०२२- २२६२६७४०

**आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई**
**मनोरुग्ण तज्ञ परिचारीका प्रशिक्षण(डी.पी.एन.)**
**प्रवेश प्रकिया सन २०२५-२६**

**सन २०२-२६ या शैक्षणिक वर्षात आरोग्य सेवा आयुक्तालय मुंबई यांच्या अधिनस्त असलेल्या मनोरुग्ण तज्ञ परिचारीका प्रशिक्षण (डी.पी.एन.) या १२ महिने पदविका अभ्यासक्रमाकरीता प्रवेश करण्यांसाठी खालील कार्यपध्दती प्रसिध्द करण्यात येत आहे.**

१) **प्रस्तावना** :- सदर माहिती पुस्तिका नियम (Information Brochoure) हे महाराष्ट्र राज्य शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिनस्थ आरोग्य सेवा आयुक्तालयाच्या अधिपत्याखाली कार्यरत सर्व प्रशिक्षण संस्थामधील मनोरुग्ण तज्ञ परिचारीका शिक्षण अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी लागु राहतील. सदर अभ्यासक्रमाचे प्रवेश हे राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचेमार्फत शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून लागु करण्यात येत आहेत.

२) **व्याख्या**:-

क) **"शासन"** याचा अर्थ महाराष्ट्र शासन असा आहे.

ख) **"सार्वजनिक आरोग्य विभाग"** याचा अर्थ महाराष्ट्र शासनाचा शासनाचा सार्वजनिक आरोग्य विभाग

ग) **"आयुक्तालय"**याचा अर्थ आयुक्त, आरोग्य सेवा आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य

घ) "**आयुक्त (आरोग्य सेवा) तथा अभियान संचालक (रा.आ.अ.)"** हे महाराष्ट्र राज्य शासनाच्या आरोग्य सेवा आयुक्तालयाचे प्रमुख होय.

च) **संचालक, आरोग्य सेवा, मुंबई** हे आरोग्य सेवा आयुक्तालयातील कार्यालय प्रमुख व सर्व विभागाचे प्रमुख होय.

छ) **उपसंचालक, आरोग्य सेवा (शुश्रृषा)** हे आरोग्य सेवा आयुक्तालयातील शुश्रृषा विभागाचे प्रमुख होय.

ज) **सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा (शुश्रृषा)** हे आरोग्य सेवा आयुक्तालयातील शुश्रृषा विभाग प्रमुखास सहाय्य करणारे होय.

झ) **"परिचर्या प्रशिक्षण केंद्र "** यांचा अर्थ आरोग्य सेवा आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य यांच्या अधिपत्याखालील परिचर्या विषयातील पदविका, पदवी व पदव्युत्तर शिक्षण देणारी परिचर्या महाविद्यालय व परिचर्या प्रशिक्षण केंद्र असा होय.

त्र) **सक्षम प्राधिकारी (Competent Authorities)** म्हणजे राज्य स्तरावर आयुक्त (आरोग्य सेवा) व अभियान संचालक (रा.आ.अ.) यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेली समिती आणि जिल्हास्तरावर जिल्हा शल्य चिकित्सक यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेली समिती होय.

ठ) **" मनोरुग्ण तज्ञ परिचारीका"** म्हणजे व्यक्ति व समाजातील मानसिक आरोग्याशी निगडीत समस्या ओळखून त्यावर रुग्णालय व समाजामध्ये ,प्रतिबंधात्मक,उपचारात्मक,सवर्धनात्मक

पुनर्वसनात्मक सेवादेण्यास सक्षम असणा-या परिचारिकांचे प्रशिक्षण देणारा ११ महिन्याचा अभ्यासक्रम होय.

ड) **"भारतीय परिचर्या परिषद"** याचा अर्थ भारतीय परिचर्या परिषद अधिनियम १९४७ ( केंद्रीय अधिनियम १९४७ चा ४८ ) च्या कलम ३ (१) च्या तरतुदीनुसार स्थापन केलेली परिषद.

ढ) **"महाराष्ट्र परिचर्या परिषद"** याचा अर्थ महाराष्ट्र परिचर्या परिषद अधिनियम, १९६६ मधील कलम ३ (१) च्या तरतुदीनुसार स्थापन केलेली परिषद.

ण ) **महाराष्ट्र राज्य शुश्रृषा व परावैद्यक शिक्षण मंडळ, मुंबई** हे राज्य स्तरावर परिचर्या एएनएम, जीएनएम, पीएचएन व डीपीएन परिचर्या अभ्यासक्रम राबविणारी व परिचर्या शिक्षणाची गुणवत्ता नियमन करणारी शासनाच्या अधिनस्त कार्यरत शिक्षण मंडळ होय.

**३) निवड प्रकिया :-**

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्या द्वारे निवड प्रकिया राबविण्यात येईल.

**संस्थास्तरावर प्रवेश नियमन समिती -**

| | | |
|---|---|---|
| १) | वैद्यकिय अधिक्षक ,प्रादेशिक मांनोरुग्णालय ठाणे / पुणे | अध्यक्ष |
| २) | मुख्य प्रशासकिय अधिकारी, उपसंचालक, आरोग्य सेवा, ठाणे / पुणे | सदस्य |
| ३) | प्राचार्य, परिचर्या प्रशिक्षण संस्था ठाणे / पुणे | सदस्य |
| ४) | प्राचार्य ,मनोरुग्ण तज्ञ परिचारीका प्रशिक्षण संस्था,ठाणे / पुणे | सदस्य सचिव |

**५) जागा वाटप:-**

मनोरुग्ण तज्ञ परिचारीका प्रशिक्षण संस्था,ठाणे / पुणे यासाठी प्रत्येकी २० या प्रमाणे सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत आरोग्य सेवा आयुक्तालयाच्या अधिनस्थ असलेल्या पात्र अधिपरीचारीका ( ७० टक्के ) तसेच वैद्यकिय शिक्षण विभागांतर्गत कार्यरत अधिपरिचारीका ( २० टक्के ) व महानगरपालिका/नगरपरिषद व खाजगी अधिपरिचारीकांकरीता ( १० टक्के ) जागा आरक्षित असतील. तसेच सदर जागा वाटपाबाबत पुरुष उमेदवारांचे प्रमाणक ९: १ ( ९महिला : १ पुरुष ) असे असेल.

**पोस्ट बेसिक डिप्लोमा मनोरुग्ण तज्ञ परिचारीका प्रशिक्षण ( ११ महिने) जागा वाटपाचे विवरणपत्र**

| अ.क्र. | प्रशिक्षण संस्थेचे नाव | प्रवेश क्षमता |
|---|---|---|
| १ | मनोरुग्ण तज्ञ परिचारीका प्रशिक्षण संस्था,ठाणे | २० |
| २ | मनोरुग्ण तज्ञ परिचारीका प्रशिक्षण संस्था, पुणे | २० |
| ३ | **एकुण** | **४०** |

टिप - दिव्यांग व्यक्तिंसाठी एकूण जागांपैकी ५ टक्के जागा आरक्षित असेल तसेच अनाथ व्यक्ति करीता अनाथ पदाची गणना पदभरतीच्या तसेच शैक्षणिक प्रवेशासाठी उपलब्ध पदसंख्येच्या १% राहील. (शासन निर्णय क्रमांक - अनाथ-२०१८/प्र.क्र.१८२/का-०३ दि. २३.८.२०२१)

- **दिव्यांग आरक्षण :-**

१. इंडियन नर्सिंग कॉन्सिलच्या पत्र क्र.एफनं.१-५/२०१८ आयएनसी दि.१९.०४.२०१९ च्या परिपत्रक "For Disabled candidates: ५% Disability of locomotors to the tune of ४०% to ५०% of the lower extremity". नुसार कार्यवाही करण्यात येईल.

२. इंडियन नर्सिंग कॉन्सिल एफनं.२२-१०/Unic-२०१९-INC दि.१८.०४.२०१९ च्या परिपत्रका नुसार "Candidate shall be medically fit. However, Colour Blind Candidates should be considered for admission to Nursing Courses subject to the condition that Colour corrective contact lens and spectacles are worn by such candidates". नुसार कार्यवाही करण्यात येईल.

**६) राखीव उमेदवारांसाठी खाली दर्शविल्यानुसार आरक्षण असेल -**

| अ.क्र. | प्रवर्ग | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती व बौध्द धर्मातरीत अनुसूचित जाती (अ.जा) | १३.० |
| २ | अनुसूचित जमाती (निर्देशित क्षेत्रांच्या बाहेर राहणा-यांसह) (अ.ज.) | ७.० |
| ३ | निरधि सूचित जमाती (अ) विमुक्त जाती) वि.जा. (अ) | ३.० |
| ४ | भटक्या जमाती - (ब) भ.ज. (ब) | २.५ |
| ५ | भटक्या जमाती - (क) भ.ज. (क) | ३.५ |
| ६ | भटक्या जमाती - (ड) भ.ज. (ड) | २.० |
| ७ | इतर मागास वर्ग (इमाव) | १९.० |
| ८ | आर्थिक दुर्बल घटक | १०.० |
| ९ | सामाजिक व आर्थिकदृष्टया मागास प्रवर्ग **(सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्रमांक -बीसीसी-२०२४/प्र.क्र.७५/आरक्षण-३ दि.११.३.२०२३ नुसार , शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशामध्ये १० टक्के आरक्षण विहीत करण्यात आलेले आहे. )** | १०.० |

**६) शैक्षणिक अर्हता:-**

- शासन पत्र क्रमांक प्रवेश-२०२३/प्र.क्र.४४०/सेवा-५ दि.१५.०६.२०२३ नुसार, मनोरुग्ण तज्ञ परिचारीका ( डीपीएन ) या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी जीएनएम/बेसिक बीएस्सी नर्सिंग ही शैक्षणिक अर्हता आहे.

**७) निवड झालेल्या उमेदवारांना प्रमाणपत्र पडताळणी करीता सादर करावयाची प्रमाणपत्रे:-**

- १० वी उत्तीर्ण गुणपत्रिका व प्रमाणपत्र
- १२ वी उत्तीर्ण गुणपत्रिका व प्रमाणपत्र
- जीएनएम/ बेसीक बीएसस्सी नर्सिंग उत्तीर्ण गुणपत्रक व प्रमाणपत्र
- अर्हताकारी परिक्षा किती प्रयत्नात उत्तीर्ण झाले त्याबाबतचे शाळा महाविद्यालयाचे प्रमाणपत्र / ( Attempt Certificate)
- महाराष्ट्र परिचर्या परिषद, मुंबई यांचेकडे नोंदीणी केलेले व नुतनीकरण केलेले प्रमाणपत्र

- सेवांतर्गत परिचारीकांना प्रवेशाच्या दिनांकास कमीत कमी ५ वर्षाचा अधिपरिचारीका या पदावरील काम केल्याचा अनुभव असल्याचे प्रमाणपत्र.
- शासकिय सेवेतील प्रवेशित परिचारीकांना प्रवेशाच्या दिनांकास सदर पदाची सेवानियमित असणे आवश्यक असून सोबत आदेशाची प्रत जोडावी.
- मागास प्रवर्गातील उमदेवाराना जातीचे प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहील.
- महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate)
- भारतीय नागरिकत्वाचा दाखला (Nationality Certificate)
- शासकिय रुग्णालयातील सक्षम वैद्यकिय अधिकारी यांनी प्रमाणित केलेले विहित नमुन्यातील वैद्यकिय प्रमाणपत्र
- आधार कार्ड

वरील सर्व प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रती प्रवेशाच्या वेळी आणणे आवश्यक आहे. तसेच संस्थेत दाखल होताना सर्व प्रमाणपत्राच्या मुळ प्रतीची पडताळणी करण्यात येईल.

**मनोरुग्ण तज्ञ परिचारीका प्रशिक्षण (डी.पी.एन.) हा एकूण १ वर्ष कालावधीचा अभ्यासक्रम पुर्णवेळ व नियमित असल्याने सदर प्रशिक्षणादरम्यान इतर कोणत्याही शैक्षणिक अभ्यासक्रमास ( नियमित अथवा दुरस्थ ) प्रवेश घेता येणार नाही.**

**८) वयोमर्यादा:-**

दि.३१.७.२०२५ रोजी उमेदवाराचे वय ५० वर्षापेक्षा जास्त नसावे.

**९) शुल्क आकारणी -**

- निवड झालेल्या उमेदवारांना भोजन खर्च, पुस्तके, स्टेशनरी, गणवेश इत्यादी खर्च स्वत: करावा लागेल, तसेच संलग्नता शुल्क,(Enrolment) परिक्षा शुल्क, एसएनए सदस्यता शुल्क यांचा विहित संस्थेत शुल्क भरणा करावा लागेल.
- या अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक शुल्क हे महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी निर्धारित केलेल्या दरानुसार राहील.
- निवड झालेल्या उमेदवारांना अभ्यास शुल्क प्रवेशाच्या वेळीच भरावे लागेल. भरल्यानंतरच विद्यार्थ्यांचा प्रवेश ग्राहय धरला जाईल.

- शैक्षणिक शुल्क शासन निर्णय क्रमांक प्रामरु २०१६/प्र.क्र.२/आरोग्य ३अ, दि.१६.०९.२०१९ नुसार डिप्लोमा इन सायकिॲट्रीक नर्सिग शुल्क प्रती विद्यार्थी प्रती वर्ष रु.२०,०००/- आकारले जाईल.

**१०) सेवातंर्गत शासकिय उमेदवारांसाठी :-**

महाराष्ट्र नागरी सेवा रजा नियम १९८१ प्रकरण ७ - अध्ययन रजा ( ८० ते ९३) अन्वये

- सेवातंर्गत उमदेवारांना ५ वर्ष अधिपरिचारीका पदावर काम केल्याचा अनुभव असणे आवश्यक आहे.
- तसेच महानगरपालिका/नगरपरिषद व खाजगी उमेदवारांना ५ वर्ष अधिपरिचारीका पदावर काम केल्याचा अनुभव असणे आवश्यक आहे.
- सेवातंर्गत उमदेवारांना म.ना.से. सेवा नियम १९८१ मधील अध्ययन रजा नियम ८० ते ९३ मधील तरतुदीनुसार अध्यन रजेबाबत कार्यवाही केली जाईल.
- ज्या सेवातंर्गत उमेदवारांनी यापुर्वी प्रतिनियुक्ती/अध्ययन रजेचा फायदा घेतलेला आहे असे सेवातंर्गत उमेदवारांना म.ना.से. रजा नियम १९८१ मधील अध्ययन रजा नियम ८० ते ९३ मधील तरतुदीनुसार अध्ययन रजा मंजुर करता येणार नाही.
- अध्ययन रजेबाबत सर्व अधिकार व अंतिम नियम हा शासनाचा असेल.
- प्रवेशासाठी निवड झालेल्या सेवातंर्गत उमेदवारास ५ वर्षे शासकिय सेवा करण्याचे सामाजिक दायित्वाचे बंधपत्र विहित नमुन्यात द्यावे लागेल. जर उमेदवारांने अभ्यासक्रमानंतर शासन सेवेतील ५ वर्षे शासन सेवा केली नाही तर प्रशिक्षण काळात अदा करण्यात आलेले वेतन व भत्त्याची रक्कम शासन नियमानुसार एक रक्कमी वसुल करण्यात येईल.

**११) शिस्त व वर्तणुक :-**

**(अ) प्रशिक्षणा दरम्यान प्रशिक्षण केंद्र व रुग्णालयात पाळावयाचे नियम:-**

परिचर्या प्रशिक्षण हा अभ्यासक्रम इतर अभ्यासक्रमापेक्षा पुर्णतः वेगळा आहे . त्याअनुषंगाने परिचर्या प्रशिक्षण केंद्रात विहित केलेले नियम विद्यार्थ्यांना बंधनकारक राहतील. प्रत्यक्ष रुग्णावर प्रात्याक्षिक करावे लागत असल्यामुळे प्रत्येक विद्यार्थिनिने परिचर्या अभ्यासक्रम स्वत: जबाबदारीने पुर्ण करणे आवश्यक आहे.यासाठी पालकांनी आपल्या पाल्याकडुन खालील नियमांचे काटेकोरपणे पालन होईल याची दक्षता घ्यावी व तसे प्रतिज्ञापत्र विद्यार्थी व पालकांनी रुपये १००/- च्या स्टॅम्प पेपरवर प्रवेश घेते वेळी सादर करावे.

१) विद्यार्थ्यांविरुध्द कोणत्याही गुन्हयाची नोंद किंवा न्यायलयीन प्रकरण प्रलंबित असु नये. याबाबत खोटी माहिती दिल्याचे आढळुन आल्यास प्रशिक्षणार्थीला प्रशिक्षणातुन काढुन टाकण्यात येईल.

२) विद्यार्थ्यांना वर्गात व रुग्णालयामध्ये मोबाईल फोन वापरण्यास सक्त मनाई आहे.

३) महाराष्ट्र राज्य शुश्रृषा व परावैद्यक शिक्षण मंडळ यांनी नेमुन दिलेल्या रजे व्यतिरीक्त कोणतीही रजा विद्यार्थ्यांना अनुज्ञेय राहणार नाही. तसेच प्रशिक्षण कालावधीत विवाह / गरोदरपण असल्यास प्रशिक्षण पुर्ण करणे हि प्रशिक्षणार्थींची जबाबदारी राहील.

४) विद्यार्थ्यांनी शैक्षणिक कालावधीत वारंवार सुट्टीवर जाऊ नये व पालकांनी त्यासाठी दबाव आणू नये.

५) विद्यार्थी प्रशिक्षण कालावधीत कोणत्याही कारणास्तव तासिकेला गैरहजर असल्यास तसेच परिक्षेसाठी उपस्थितीचे दिवस कमी पडल्यास विद्यार्थ्यांना महाराष्ट्र राज्य शुश्रृषा व परावैद्यक शिक्षण मंडळ यांचे नियमानुसार परिक्षेला बसता येणार नाही.

६) भारतीय परिचर्या परिषद व महाराष्ट्र राज्य शुश्रृषा व परावैद्यक शिक्षण मंडळ यांनी नेमून दिलेल्या अभ्यासक्रमाच्या नियमांचे पालन विद्यार्थ्यांनी काटेकोरपणे करणे आवश्यक आहे.

७) शैक्षणिक सहली,भेटी, ग्रामिण अनुभव, आऊटपास इ. साठी बाहेर गेल्यावर एखादी दुर्घटना घडल्यास संस्था जबाबदार राहणार नाही.

८) प्रशिक्षणा दरम्यान विद्यार्थ्यांने कोणतेही बेकायदेशीर/अनैतिक कृत्य केल्यास त्या विद्यार्थ्यावर त्याची संपुर्ण जबाबदारी वैयक्तिकरित्या राहील व त्याला/तिला प्रशिक्षणातुन काढण्यात येईल. तसे अधिकार संस्थाप्रमुखांना असतील.

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक ०२/०४/२००८ च्या आदेशान्वये लिंगडोह समितीच्या रॅगिंग विरोधी शिफारसीनुसार तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दिनांक १४.१२.२००९ च्या नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

- प्रशिक्षणार्थी/ विद्यार्थी रॅगिंगच्या कृत्यामध्ये दोषी आढळल्यास त्याला/तीला निलंबित केले जाईल. तसे संस्थास्तरावर शपथपत्र लिहुन घेतले जाईल.
- खालील प्रमाणे संस्थास्तरावर रॅगिंग विरोधी समिती गठीत करण्यात यावी.

| | |
|---|---|
| वैद्यकिय अधिक्षक | अध्यक्ष |
| अधिसेविका | सदस्य |
| परिचर्या अधिकारी/प्राचार्य | सदस्य सचिव |

- नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांना उपरोक्त समिती सदस्यांचे दुरध्वनी क्रमांक दिले जातील.

महाराष्ट्र शासनाच्या सन १९९९ च्या रॅगिंग विरोधी कायद्याचे पालन करणे सर्व प्रवेशित विद्यार्थ्यांना बंधनकारक राहिल.

९) अतंर्गत मुल्यांकन करीता वेळोवेळी चाचणी परिक्षा, केसस्टडी, केस प्रेझेंटेशन , नर्सिंग केअर प्लान, प्रात्यक्षिक परिक्षा इत्यादी घेतल्या जातील, त्या वेळोवेळी पुर्ण करणे बंधनकारक राहील. त्यामध्ये उत्तीर्ण होणे आवश्यक आहे, अन्यथा अंतिम परिक्षेस बसता येणार नाही.

१०) विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेण्यासाठी दर ६ महिन्यांनी एक या प्रमाणे एका शैक्षणिक वर्षात किमान २ पालक सभा घेण्यात येतील. यासाठी पालकांनी उपस्थितीत रहावे.

११) विना परवानगी घरी राहील्यास १ दिवस गैरहजेरीसाठी १:१ याप्रमाणात उपलब्ध रजेतून रजा कपात करण्यात येईल.

१२) प्रत्येक विद्यार्थ्यांनी आपला वर्ग व आजुबाजुचा परिसर स्वच्छ ठेवणे. तसेच् वर्गाच्या व इमारतीच्या भिंतीवर लिखाण करु नये, रंग उडवु नये. (विशेषतः धुलीवंदनाच्या दिवशी)

१३) नेमुन दिलेल्या वॉर्ड व्यतिरीक्त इतरत्र फिरु नये. तसेच सुटटी असेल तेव्हा रुग्णालयामध्ये अथवा रुग्णालयाच्या आवारामध्ये विनाकारण फिरु नये.

१४) सर्व विद्यार्थ्यांनी वॉर्ड मधुन वेळेत क्लासरुममध्ये हजर रहावे.

१५) रुग्णालयीन अनुभव घेण्यासाठी कक्षात जाताना संपुर्ण गणवेशामध्येच जावे. तसेच पाउच मध्ये सर्व शैक्षणिक साहित्य असणे अनविार्य आहे.

१६) सर्व प्रशिक्षाणार्थ्यीचे दर महिन्याला तिस-या शनिवारी मानसोपचारतज्ञ यांचेकडुन समुपदेशन करण्यात येईल. तसेच प्रशिक्षणार्थ्यींना त्यांच्या काही वैयक्तिक बाबी तसेच कुठल्याही प्रकारची गंभीर समस्या किंवा मानसिक त्रास जाणवल्यास त्यांनी आई, वडील, संस्थेतील वरिष्ठ अधिकारी किंवा मानसोपचार तज्ञ यांच्याकडुन समुपदेशन करुन घेण्यात याबे.

१७) प्रशिक्षाणार्थ्यींना प्रात्यक्षिक अनुभव, प्रशिक्षण केंद्र तसेच संबंधित काही समस्या असल्यास त्वरीत संबंधित वरिष्ठांशी संपर्क साधावा.

१८) प्रशिक्षणार्थ्यींच्या आई वडीलांनी वेळोवेळी आपल्या पाल्यांच्या संपर्कात राहुन यशस्वीरित्या प्रशिक्षण पुर्ण करण्यासाठी त्यांचे मनोबल वाढवावे. तसेच आपल्या पाल्यांना प्रशिक्षणासंबंधित काही समस्या आहे असे आढळुन आल्यास ताबडतोब संस्थेतील वरिष्ठ अधिका-यांशी संपर्क साधावा.

१९) प्रशिक्षणार्थीनी प्रशिक्षण काळात त्यांच्या वर्तणुकीमुळे संस्थेला त्रास होणार नाही याची दक्षता घ्यावी.

**(ब) प्रशिक्षणादरम्यान वसतिगृहात पाळावयाचे नियम**

१) वसतिगृहाचा वापर फक्त विद्यार्थ्यीनीसाठीच आहे. इतर कोणत्याही व्यक्तींना बसतीगृहात प्रवेशास सक्त मनाई आहे.

२) नातेवाईकाकरीता भेटावयाचे नियम.

- विद्यार्थ्याला भेटायला येणा-या नातेवाईकांची नावे, पत्ते व फोटो, आधारनंबरसहित प्रशिक्षणासाठी हजर होताना देणे आवश्यक आहे. तसेच त्याच नातेवाईकांना भेटण्यास परवानगी देण्यात येईल, त्या व्यक्तीरिक्त इतर कोणासही भेटण्यास परवानगी मिळणार नाही व यासाठी कोणाचाही दबाब आणु नये.
- नातेवाईकांनी भेटावयाची वेळ आठवडयातुन दोन वेळा सायंकाळी ४ ते ६ व रविवारी सकाळी १० ते ६ या वेळेतच विद्यार्थ्यांना प्रतिक्षा दालनात भेटता येईल.
- तसेच आठवडयातुन एक दिवस विद्यार्थ्यांना ३ तासाचा आऊट पास देण्यात येईल.

- रुग्णालय परिसरामध्ये नातेवाईकांशी बोलत राहु नये. प्रशिक्षणार्थींना वसतिगृहात भेटण्यासाठी आई वडिल व सख्खे भावंड यांनाच परवानगी असेल व प्रत्येक भेटीची नोंद रजिस्टरमध्ये घेण्यात यावी. नातेवाईकांचे ओळखपत्र तपासूनच त्यांना प्रशिक्षणार्थींना भेटण्यास परवानगी देण्यात येईल.

३) वसतिगृहातील टेरेसला कुलुप असावे व त्याची चावी अधिसेविका/परिचर्या अधिकारी यांच्या ताब्यात असतील .

४) वसतिगृहात विजेची शेगडी व विद्युत उपकरणे वापरण्यास सक्तमनाई आहे. प्रशिक्षणार्थींनी खोलीमध्ये कोणत्याही प्रकारची अपायकारक वस्तू/ हत्यारे ठेवू नयेत तसे आढळल्यास सक्त कारवाई करण्यात येईल .

५) विद्यार्थ्याला एखादा गंभीर आजार असल्यास उदा. अपस्मार, गर्भाशय व मासिक पाळी संबंधित आजार, त्वचेचे आजार असल्यास विद्यार्थी व पालकांनी प्रवेशाच्यावेळी संस्थेला अवगत करावे.

६) आजारी विद्यार्थ्यांने वेळेत वर्गशिक्षक,सार्वजनिक आरोग्य परिचारीका, वॉर्डन यांना सुचित करुन उपचार करुन घेणे. एकटे रुमवर झोपुन राहु नये. विद्यार्थ्यांनीला ॲडमीट केल्यास पालकांना बोलविण्यात येईल. पालकांनी त्वरीत आपल्या पाल्याला भेटण्यास यावे.

७) सांसर्गिक रोग झाल्यास वसतिगृहातुन उपचारासाठी घरी पाठविण्यात येईल व रोग बरा झाल्याचे वैद्यकिय अधिका-याचे पत्र असल्याशिवाय हजर करुन घेतले जाणार नाही.

८) प्रशिक्षण काळात वैयक्तिक साहित्याची चोरी किंवा आपापसात झालेल्या भांडणाची पोलीस तक्रार वरिष्ठांच्या परवानगी शिवाय करता येणार नाही.

९) रुम काही कारणास्तव बदलावयाची असल्यास वॉर्डनला लेखी अर्ज करुन बदलुन घेता येईल.

१०) वसतिगृहातील रिक्त खोल्यांना तसेच विनावापर खोल्यांनाही अभ्यागत कक्ष आणि चेजिंग रुम यांनाही रात्री ८ नंतर कुलुप असावे व त्यांच्या किल्या वार्डनच्या ताब्यात असतील .

११) रात्री १० वाजता वॉर्डन व कार्यरत नाईट सुपर यांनी वसतिगृहात राऊड घेतील व सर्व विद्यार्थीनी हजर आहेत हे पहातील. तसेच आठवडयातुन एक दिवस वॉर्डन व सहाय्यक अधिसेविका हया प्रशिक्षणार्थींच्या वसतीगृहातील खोल्यांची तपासणी करतील .

१२) सुरक्षिततेच्या कारणास्तव वसतिगृहाच्या आवारात (प्रवेशद्वार, अभ्यंगत कक्ष, मेस व जेवणाची खोली, प्रत्येक मजल्यावरील व्हरांडा इ.) सी.सी.टीव्हीची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

१३) वसतिगृहामध्ये तक्रार पेटी ठेवण्यात आलेली असून प्राप्त झालेल्या तक्रारीचे तक्रार निवारण समितीमार्फत वेळोवेळी निवारण करण्यात येईल .

१४) वसतिगृहामध्ये प्रशिक्षणार्थीशी संबंधित असलेल्या नोंदी (आहार पुस्तक, हजेरी पुस्तक, आऊट पास व नाईट पास यांचे पुस्तक, पालक भेटीचे पुस्तक, जमा खर्चाचे पुस्तक इत्यादी) वॉर्डन वेळोवेळी अद्यावत करतील .

१५) वसतिगृहामध्ये कुठेही तोडफोड / नासधुस केल्यास सक्त कारवाई करण्यात येईल.

१६) वसतिगृहात कोणत्याही स्वरुपाचा गोंधळ करु नये.

**क ) मेसमध्ये पाळावयाचे नियम.**

१) सकाळी ७ ते ७:३० या वेळेतच चहा नाश्ता मिळेल.

२) दुपारी ठरवुन दिलेल्या वेळेतच (१२ ते १) जेवण मिळेल.

३) संध्याकाळचा चहा ४ ते ५ या वेळेतच मिळेल.

४) रात्रीचे जेवण केवळ संध्याकाळी ७ ते ८ यावेळेतच मिळेल.

५) जेवण केवळ आहारगृहातच करावे. रुमवर जेवण घेऊन जाऊ नये.

६) आवश्यक असेल तेवढेच अन्न घ्यावे. अन्न वाया घालवु नये.

७) उरलेले अन्न कचरा डब्ब्यामध्येच टाकावे. इतरत्र फेकु नये.

८) मेस फी दर महिन्याच्या ५ तारखेपर्यंत मेस क्लब मध्ये जमा करावी.पाण्याचा व विजेचा वापर काटकसरीने व आवश्यक तेवढा करावा. काम झाल्यावर नळ, पंखा व लाईट बंद करावेत.

९) वसतिगृह आपले असल्यामुळे स्वच्छता ठेवावी. बाथरुम तुंबणार नाही याची काळजी घ्यावी.

**१२) विद्यार्थ्यांचे स्थानांतर:-**

डीपीएन अभ्यासक्रमाकरीता एका संस्थेत प्रवेश दिल्यानंतर प्रशिक्षण पुर्ण, होईपर्यंत कोणत्याही परिस्थितीत विद्यार्थ्यांना दुस-या संस्थेत स्थानांतर करता येणार नाही.

**१३) विशेष सुचना:-**

- उमेदवाराना प्रवेशाच्या वेळी प्रमाणपत्रांच्या साक्षांकित (ॲटेस्टेड) सत्यप्रती सादर कराव्यात. मुळ प्रमाणपत्रे प्रवेशाच्या वेळी पडताळणी करिता संस्थाप्रमुखांना सादर करावीत. मुळ प्रमाणपत्रे व गुणपत्रिकांच्या छाननी किंवा पडताळणीच्या वेळी कोणत्याही त्रुटी, चुकीची माहिती किंवा गुणपत्रिकेत अनधिकृत खाडाखोड अथवा बदल केल्याचे आढळुन आल्यास संबंधित उमेदवाराचा अर्ज तात्काळ नाकारण्यात येईल. किंबहुना त्याला आधिच प्रवेश देण्यात आला असल्यास तो रद्द करण्यात येईल. प्रवेशित विद्यार्थ्यांचे मुळ प्रमाणपत्रे हे कार्यालयात प्रशिक्षण पुर्ण होईपर्यंत जमा करुन घेण्यात यावीत. याची नोंद प्राचार्यानी घ्यावी.प्रशिक्षण पुर्ण केल्यानंतर सर्व प्रमाणपत्रे परत करुन पोच घ्यावी.

9LP

- प्रशिक्षणाकरीता पात्र ठरविण्यात आलेला उमदेवार शारीरिक व मानसिकदृष्टया सक्षम असणे आवश्यक आहे. यारिता ज्या संस्थेत उमेदवाराने अर्ज केला असेल, त्याच संस्थेत त्याची वैद्यकिय तपासणी केल्यानंतर उमेदवार प्रशिक्षणासाठी पात्र ठरेल.वैद्यकिय तपासणीत उमेदवार शारीरिक व मानसिकदृष्टया अपात्र ठरल्यास प्रशिक्षणातुन काढुन टाकण्यात येईल. सदर तपासणी संस्था प्रमुखांनी एक महिन्यात करुन घेणे बंधनकारक राहील.
- प्रशिक्षण कालावधी दरम्यान प्रशिक्षाणार्थींनी आपल्या वर्तणुकीने संस्थेची बदनामी अथवा प्रशासकियदृष्टया प्रकरण गंभीर असल्यास संबंधीत विद्यार्थ्यास प्रशिक्षणातून निष्कासित (Rusticate) करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.
- संस्थेत प्रवेश घेतल्यानंतर विद्यार्थी प्रशिक्षण अर्धवट सोडुन गेल्यास शैक्षणिक वर्षाच्या मध्यावर प्रवेश बंद दिनांकानंतर रिक्त जागा भरण्याकरीता दुस-या उमेदवारास प्रवेश देणे शक्य नसते. त्यामुळे शासकिय संस्थेतील जागा रिक्त राहिल्याने पात्र व होतकरु उमेदवाराचे नुकसान होते.यास्तव,प्रशिक्षणा दरम्यान प्रशिक्षण सोडुन गेल्यास व कोणत्याही कारणास्तव प्रवेश रद्द केल्यास **लॅप्स ऑफ सीट चे रु.५०,०००/-** इतके शुल्क आकारण्यात येईल.व त्याची शासकिय पावती देण्यात येईल. याची सर्व उमेदवारांनी नोंद घेण्यात यावी.

********************************

## Declaration

I hereby declare that I have read the rules of admission & after understanding these rules, I have filled the admission form for the Post Basic Diploma in Psychiatric Nursing.

I have filled all the information in my own handwriting & given information is true to the best of my knowledge. I further understand that in case if the information is found to be incorrect or false my admission will be automatically stand cancelled.

I fully understand that the head of the institution where I am studying will have rule liberty to expel me from the Diploma in Psychiatric Nursing (DPN) College for any misbehaviour, misconduct & undesirable activities I will be liable for disciplinary action.

Date:
Place:

**Name & Signature of applicant**